बी. ए. तृतीय वर्ष

# विषय : भाषा विज्ञान (सत्र ५ वे)

अभ्यास पत्रिका – १०

## घटक क्रमांक : १ भाषेचे स्वरूप व लक्षणे


**प्रा. डॉ. अनिल गर्जे**

मराठी विभाग प्रमख

# भाषा म्हणजे काय?

मानवी समाजाने स्वत:च्या विकासाच्या अवस्थेत भाषा या एका अतिशय महत्त्वाच्या वस्तूची निर्मिती केली. भाषा हा शब्द ‘भाष’ म्हणजे या अर्थाच्या संस्कृत धातूपासून बनला आहे. माणसाच्या मनातील विचार, कल्पना व्यक्त करण्यासाठी मुखावाटे निघालेल्या ध्वनींचा सार्थसमूह म्हणजे भाषा. हे शब्दरुप साधन प्रामुख्याने मौखिक म्हणजे ध्वनीरुप असते

# भाषेच्या व्याख्या

भाषा विज्ञानातील मान्यवरांच्या भाषेविषयीच्या व्याख्या पुढीलप्रमाणे–

१) कृ.पां. कुलकर्णी : ‘भाषा म्हणजे व्यवहारास प्रवृत्त करणाऱ्या सार्थ व अन्वित ध्वनिंचा समूह’

२) ना. गो. कालेलकर : ‘मूळ आशयाशी कार्यकारणसंबंध नसलेल्या ध्वनी संकेतांनी बनलेली, समाज व्यवहाराला साह्यभूत अशी भाषा ही एक पध्दत आहे. ’

३) श्री. न. गजेंद्रगडकर : ‘यादृच्छिक ध्वनीसंकेतावर आधारलेली, समाज व्यवहाराला साह्यभूत अशी पध्दत म्हणजे भाषा’

# भाषेचे स्वरुप

१) भाषा जन्मसिध्द नसूनही तशी वाटते.
२) भाषा ही प्रयत्नसाध्य आहे.
३) भाषेला इतिहास असतो.
४) भाषेत परिवर्तनशिलता असते.
५) भाषा ध्वनींनी बनलेली असते.
६) भाषा लिखीत व नोंदवलेली असते.
७) भाषा ही एक सामाजिक संस्था आहे.
८) भाषेमुळे संस्कृती संक्रमण होते.

# भाषेची विविध लक्षणे

१) निर्मितीशिलता
२) यादृच्छिकता
३) अदलाबदल
४) हेतूनिरपक्षता
५) विविधता
६) स्थलकालितता
७) विशिष्टता
८) उत्पादनक्षमता
९) भाषा विविधरुपिणी असते
१०)भाषेची प्रतिकात्मकता